# महाराष्ट्र न्यायिक अकादमी आणि भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था

(ISO 9001-2008 Certified Institute)

उत्तन, भाईंदर, जिल्हा ठाणे ४०१ १०६

निविदा जा.क्र. मन्याअ/उत्तन/ 1495 /२०१५ दिनांक : १८/११/२०१५

## खरेदीच्या मालाचे स्वरूप

अ) गाद्यांची लांबी १८० सें.मी. व रुंदी ९० सें.मी. असावी.

ब) गाद्यांची जाडी ही सुमारे ५ ते ६ सें.मी. एवढी असावी.

क) उशा या सुमारे ४५ से.मी. ७० से.मी. एवढया असाव्यात.

ड) गाद्या ह्या उच्च प्रतीच्या कच्च्या मालाने व पाठदुखी किंवा अन्य त्रास होणार नाही अशा प्रकारे बनविलेल्या असाव्यात व त्यांचा पृष्ठभाग उच्च प्रतीचे कापडाचा असावा.

इ) उशा या मान्यताप्राप्त व उत्तम दर्जाच्या असाव्यात व त्यांचा पृष्ठभाग उच्च प्रतीच्या कापडाचा असावा.

## अटी व शर्ती

१. सदर मालाचा पुरवठा अकादमीचे ''महाराष्ट्र न्यायिक अकादमी आणि भारतीय मध्यस्थी केंद्र व प्रशिक्षण संस्था, उत्तन–गोराई रोड, भाईदर (प.) जि. ठाणे – ४०१ १०६'' येथील कार्यालयात कामाचे आदेश मिळालेपासून ७ दिवसाचे आत करणेचा आहे.

२. निविदेसोबत पुरविण्यात येणाऱ्या मालाचा प्रत्येकी एक नमुना स्वखर्चाने सादर करणे बंधनकारक आहे.

३. निविदेसोबत अनामत रकमेपाटी ५ हजार रुपयाचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा 'Maharashtra Judicial Academy & I.M.C. & T.I.' या नावे काढलेला धनाकर्ष सादर करणे बंधनकारक राहील.

४. यशस्वी निविदाधारकास त्याची अनामत रक्कम मालाचा समाधानकारक पुरवठा केल्यानंतर ३० दिवसांचे कालावधीत परत करण्यात येईल. तसेच अयशस्वी निविदाधारकांना त्यांचे धनाकर्ष निविदा स्विकारल्यानंतर १५ दिवसांचे आत परत करण्यात येतील.

५. इच्छुकांनी आपली निविदा सीलबंद करुन दिनांक २४/११/२०१५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत अकादमीच्या उत्तन येथील कार्यालयात ''सहसंचालिका, महाराष्ट्र न्यायिक अकादमी आणि भारतीय मध्यस्थी केंद्र व प्रशिक्षण संस्था, उत्तन–गोराई रोड, भाईदर (प.) जि. ठाणे'' यांचे नावे द्याव्यात. सदर निविदा त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता उपस्थित असलेल्या निविदाधारकांचे समक्ष मा. सहसंचालिका, महाराष्ट्र न्यायिक अकादमी यांचे निजी कक्षामध्ये म्हणजेच खोली क्र. २१२, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत या ठिकाणी उघडणेत येतील. निविदा स्वीकारतांना निविदादाराची गुणवत्ता, लौकिकता व क्षमता याबाबींचा व तसेच योग्य त्या आवश्यक बाबींचा विचार करण्यात येईल.

६. मा. सहसंचालिका यांना कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे अगर नाकारण्याचे अधिकार रहातील. तसेच कमीत कमी दराचीच निविदा स्विकारणे हे संस्थेवर बंधनकारक राहणार नाही.

७. निविदेच्या अटीत गरजेनुसार बदल करण्याचे व कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. सहसंचालिका यांना राहतील.

८. कोणत्याही निविदाधारकाने कोणत्याही प्रकारे आपल्या निविदेच्या प्रचारार्थ अकादमीचे अधिकारी/कर्मचा--यांशी अवैध संपर्क साधल्यास त्याची निविदा केवळ तेवढयाच कारणास्तव नाकारण्यात येईल.

17/11/15

**सहसंचालिका**

विशेष टीप : निविदा स्विकारण्याचे सर्व अधिकार सदर अकादमीच्या मा. सहसंचालिका यांचे राहतील. याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सहसंचालक यांचा निर्णय अंतीम राहील.

सहसंचालिका 17/11/15